# यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी
(महाराष्ट्र शासनाची अंगीकृत संस्था)
## Yashwantrao Chavan Academy of Development Administration
(A Government of Maharashtra Organisation)

सत्यमेव जयते

यशदा®
ISO 9001 : 2008


क्र.-प्रापण/२०१४-१६/कॉ.स्टे. टेन्डर
दिनांक : २३/०७/२०१५

प्रति,
मे. ऍमी बिझनेस,
१० बी, आनंदी , विजयश्री को. ऑप. हाऊसिंग, सोसायटी
न्यू डीपी रोड, अ.क्र. ५०, कोथरुड, पुणे-४११ ०३८.

**विषय** - सन २०१४-१६ या कलावधीसाठी कॉम्प्युटर स्टेशनरी रिबन, टोनर, कार्टरेज इत्यादी साहित्य खरेदी करण्यासाठी निविदा.

**संदर्भ** – १) आपली कॉम्प्युटर स्टेशनरी रिबन, टोनर, कार्टरेज इ. साहित्य पुरवठा करण्यासाठीची निविदा
२) मे. कॅनन इंडिया प्रा. लि. यांचे दिनांक ०८ सप्टेंबर २०१४ चे पत्र
३) यशदाकडील पत्र क्रमांक प्रशा-४/२०१४-१६/कॉ. स्टे, दिनांक २४ सप्टेंबर २०१४ रोजीचे पत्र

सन २०१४-१६ या सालासाठी कॉम्प्युटर स्टेशनरी रिबन, टोनर, कार्टरेज इत्यादी साहित्य खरेदी करण्यासाठी वार्षिक दरकरार करण्याबाबत यशदाकडून दिनांक २९/०५/२०१४ ते दिनांक १८/०६/२०१४ या कालावधीमध्ये जाहिर ई-निविदा मागविण्याबाबत दिनांक २९/०५/२०१४ रोजीच्या दैनिक सकाळ, इंडियन एक्स्प्रेस ग्रुप, महाराष्ट्र टाईम्स, व पुढारी या वृत्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन आपण ई-निविदा सादर केलेली होती.

०२. सदर ई-निविदेसोबत आपणाकडून कॉम्प्युटर टोनरचे निर्माते मे. कॅनन इंडिया प्राय. लि. या कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे संबंधित कंपनीच्या प्रतिनिधिकडून निर्गमित करण्यात आलेल्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे. जोडण्यात आलेली प्रमाणपत्रे खरे आहेत किंवा कसे याची पडताळणी करण्यासाठी ती संबंधित कंपनीकडे पाठविण्यात आलेली होती. त्यावर सदर प्रमाणपत्रे खोटे व बोगस स्वरुपाचे असून ती कंपनीकडून निर्गमित करण्यात आली नसल्याचे संबंधित कंपनीच्या प्रतिनिधीकडून यशदास कळविण्यात आलेले आहे. (सोबत – पत्राच्या प्रती आपल्या माहितीस्तव जोडलेल्या आहेत)

०३. आपण खोटी व बोगस प्रमाणपत्रे सादर करुन यशदाची अर्थातच शासनाची फसवणूक केलेली आहे व वेळेचाही नाहक अपव्यय केलेला आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक ०३ नुसार आपणाकडून ईएमडी करीता प्राप्त झालेली रक्कम रु. ५०००/- जप्त का करण्यात येऊ नये व भविष्यात पुढील १० वर्ष म्हणजेच डिसेंबर २०२४ अखेर पर्यंत आपणास यशदाची कोणतीही निविदा भरण्यास प्रतिबंध का करण्यात येऊ नये व आपल्या नावाचा समावेश काळया यादीत का करण्यात येऊ नये, अशी विचारणा करण्यात आलेली होती व तसा खुलासा दिनांक ८/१०/२०१४ पर्यंत सादर करण्याबाबत कळविले होते. त्यास अनुसरुन आपण दिनांक ७ आक्टोबर २०१४ रोजीच्या आपल्या पत्रान्वये यशदाकडे खुलासा सादर केला आहे, तथापि आपणाकडून सादर करण्यात आलेला खुलासा समाधानकारक वाटत नसल्याने अमान्य करण्यात येत आहे.

०४. अर्थिक वर्ष २०१४-१६ या कालावधीसाठी आपण सादर केलेले प्रमाणपत्रे खोटे असल्याबाबत मे. कॅनन इंडिया प्रा. लि. या कंपनीने त्यांच्या दिनांक ०८ सप्टेंबर २०१४ रोजीच्या पत्रान्वये यशदाला कळविले आहे, त्यामुळे आपण खोटे प्रमाणपत्र सादर करुन यशदाची फसवणूक केलेली आहे, सबब २०१४-१६ या वर्षासाठी आपण भरलेली ईएमडी रक्कम रुपये ५,०००/- जप्त करण्यात येत आहे,

E:\LAXMAN VETAL- 2015-16\COMPUTER (toner) TENDER 23-07-2015

(कृ.मा.पा.)

तसेच आपला समावेश यशदाच्या काळ्या यादीत करण्यात येऊन भविष्यात पुढील १० वर्ष म्हणजे २०२५ डिसेंबर अखेरपर्यंत आपणास यशदाच्या कोणत्याही प्रकारच्या निविदाप्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रतिबंध करण्यात येत आहे.

निबंधक,
यशदा, पुणे-०७

प्रत -

१. मा. संचालक, माहिती तंत्रज्ञान केंद्र यांनी यशदाच्या वेबसाईटवर यशदातील ठेकेदाराची ब्लॅक लिस्टचे फोल्डर तयार करुन त्यामध्ये सदर ठेकेदाराचा काळया यादीमध्ये समावेश केल्याबाबतच्या तपशीलाचा समावेश करावा.

२. लेखाधिकारी यांनी सदर ठेकेदारांची बयाणा रक्कम परत करु नये.

[redacted]

C-101

**Speed Post by RPAD**

क्र.प्रशा-४/२०१४-१६/कॉ.स्टे.
दिनांक : २४.०९.२०१४

प्रति,

M/s AMI BUSINESS VENTURES
10 B, ANANDI, VIJAYSHRI CO OP HOUSING SOCIETY
NEW DP ROAD, SR NO.50,
KOTHRUD
PUNE- 411038

**विषय :- सन २०१४-१६ या सालासाठी कॉम्प्युटर स्टेशनरी रिबन, टोनर, कार्टरेज इ. साहित्य खरेदी करण्यासाठी वार्षिक दरकरार करण्याबाबत**

संदर्भ :- १) आपली कॉम्प्यूटर स्टेशनरी रिबन, टोनर, कार्टरेज इ. साहित्य पुरवठा करण्यासाठीची निविदा
२) मे कॅनन इंडिया प्रा लि यांचे दिनांक ०८ सप्टेबर २०१४चे पत्र

सन २०१४-१६ या सालासाठी कॉम्प्यूटर स्टेशनरी रिबन, टोनर, कार्टरेज इ. साहित्य खरेदी करण्यासाठी वार्षिक दरकरार करण्याबाबत यशदाकडुन दिनांक २९.०५.२०१४ ते १८.०६.२०१४ या कालावधीमध्ये जाहिर ई-निविदा मागविण्याबाबत दिनांक २९.०५.२०१४ रोजीच्या दैनिक सकाळ, इंडियन एक्सप्रेस ग्रुप, महाराष्ट्र टाईम्स व पुढारी या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून आपण ई-निविदा सादर केलेली होती.

०२ सदर ई-निविदेसोबत आपणाकडुन कॉम्प्यूटर टोनरचे निर्माते मे कॅनन इंडिया प्रा लि या कंपनीचे अधिकृत विक्रेते असल्याचे संबंधित कंपनींच्या प्रतिनिधीकडून निर्गमित करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांची झेरॉक्स प्रत जोडण्यात आलेली आहे. जोडण्यात आलेले प्रमाणपत्र खरे आहे किंवा कसे याची पडताळणी करण्यासाठी ते संबंधित कंपनीकडे पाठविण्यात आलेले होते. त्यावर सदर प्रमाणपत्र खोटे व बोगस स्वरूपाचे असून ते कंपनीकडून निर्गमित करण्यात आले नसल्याचे संबंधित कंपनीच्या प्रतिनिधीकडून यशदास कळविण्यात आलेले आहे.

(कृ.मा.प)

ISSUED
Date : 26/9/2014
2577

०३ पुर्वपृष्ठावरील पार्श्वभुमी लक्षात घेता आपण खोटे व बोगस प्रमाणपत्र सादर करून यशदाची अर्थातच शासनाची फसवणुक केलेली आहे व वेळेचाही नाहक अपव्यय केला आहे. सदर प्रकरणी आपणावर खालील प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत यशदाकडुन गांभिर्यपुर्वक विचार करण्यात येत असून खाली नमुद करण्यात आलेल्या मुद्यावर आपणाकडुन लेखी खुलासा मागविण्यात येत आहे.

०१ आपणाकडुन निविदेसोबत सादर करण्यात आलेली बयाणा रक्कम रूपये ५०००/- जप्त का करण्यात येवू नये

०२ भविष्यात पुढील १० वर्षे म्हणजे २०२४ अखेरपर्यंत यशदामधील कोणत्याही प्रकारच्या निविदेमध्ये सहभाग घेण्यास आपणास प्रतिबंध का करण्यात येवू नये

०३ यशदातील काळया यादीमध्ये आपल्या नावाचा का समावेश करण्यात येवू नये

०४ वरील मुद्याबाबत आपणाकडुन लेखी खुलासा दिनांक ०८.१०.२०१४ रोजी पर्यंत न चुकता निम्मस्वाक्षरितांकडे सादर करण्यात यावा. आपण लेखी खुलासा सादर न केल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

25/9/2014

(निबंधक)
यशदा, पुणे

= 197/03-

**Canon**

CANON INDIA PRIVATE LIMITED
4th Floor & 5th Floor, Natraj by Rustomjee,
194, Junction of Western Express Highway
& Andheri Kurla Road, Andheri (E),
Mumbai 400 069, India.
Telephone : (91-22) 6714 5000
Facsimile : (91-22) 6714 5054
Website : www.canon.co.in

Date. Sep 8th' 2014

To,

Director General,
Yashwantrao Chavan Academy of
Development Administration,
Rajbhavan Complex, Baner Road,
Pune – 411 007

Sir,

Canon India Private Limited is the sole distributor of the Canon Branded products in India.

This is to inform you that below parties -

1. M/s Ami Business Ventures, 16 B, Vijayshree Co-Op. Society, New DP Road, Kothrud, Pune
2. M/s Focus Sales Corporation, C-4, Shop No. 20, Empire State, Chinchwad, Pune – 411019
3. Shiv Technology, Pune

are neither an authorized dealer nor a reseller of Canon India Private Limited for supply of Canon Branded products.

This is for your information and records.

Regards,

Sandhya Shetty,
Senior Manager – Channel Sales
Consumer Systems Product Division
Canon India Private Limited.

16/9/14

Canon India Pvt. Ltd
Registered Office
D-179, Okhla Industrial Area,
Phase-I, New Delhi-110020. India
CIN : U74899DL1996PTC08377
Telephone : (91-11)4066600
Facsimile : (91-11)4066601
Website : www.canon.co.in

२६७६५-
(न२५

08 OCT 2014

1429

# AMI
BUSINESS VENTURES

10 B Vijayashree Society, New D P Road
Gananjay, Kothrud, Pune-411038
PH + 91 020264 705575
MO + 91 94233 27884
enquiry@amibusinessventures.com

दिनांक : ८/१०/२०१४

प्रति,
मा. निबंधक,
यशदा, बाणेर रस्ता,
पुणे

संदर्भ: आपले दि. २४/९/२०१४ रोजीचे पत्र क्र. प्रशा-४/२०१४-१६/कॉ. स्टे.

विषय: सन २०१४-१६ या सालासाठी कॉम्प्युटर स्टेशनरी, रिबन, टोनर, कार्टरिज इ. साहित्य खरेदी करण्यासाठी वार्षिक दरकरार करण्याबाबत

महोदय,

आपले वरीलसंदर्भिय पत्र मिळाले. त्यात नमुद केलेले कॅनन कंपनीचे अधिकृत विक्रेता असल्याचे प्रमाणपत्र आम्हांस सदर कंपनीकडुन मिळाले होते. व आम्हांला असे कळविण्यात आले होते की सदरचे प्रमाणपत्र ग्राह्य व बरोबर आहे. त्यामुळे मी सदर प्रमाणपत्र आपल्या कार्यालयात सादर केले.

सदरचे प्रमाणपत्र सादर करुन आपली वा शासनाची दिशाभुल अथवा फसवणुक करण्याचा आमचा बिलकुल प्रयत्न नव्हता. आम्ही आपणांस कळवु इच्छितो की आम्ही आपल्या कार्यालयात सादर केलेल्या इतर सर्व कंपन्यांचे प्रमाणपत्रेही बरोबर व ग्राह्य आहेत. याबाबत झालेल्या गैरसमजुतीचा आम्हांस खेद आहे.

तरी याबाबत आमच्यावर कोणतीही कार्यवाही करु नये, ही विनंती. तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासु

AMI Business Ventures
Pune

(अमित गुजर)
एमी बिझनेस वेंचर्स करीता